**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (प),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

**दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890**
**फॅक्स : 0250-2525107**
**ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com**

**जावक क्र: व.वि.श.म./ / /२५-२६**
**दिनांक : 21/08/2025**

# वसई विरार शहर महानगरपालिका

**अतिवृष्टीमुळे आरोग्य समस्या निर्माण न होण्यासाठी महानगरपालिकेमार्फत विविध उपाययोजना कार्यरत.**

वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात झालेल्या अतिवृष्टीमुळे नागरिकांना विविध सेवा सुविधा देण्याचे काम महानगरपालिकेमार्फत सुरुवातीपासूनच सुरु आहे. पावसाचे पाणी ओसरत असून आरोग्याची कोणतीही समस्या निर्माण होऊ नये यासाठी मनपा घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत स्वच्छता दूतांद्वारे शहरात स्वच्छतेचे काम युद्धपातळीवर सुरु असून पावसाच्या पाण्यात वाहून आलेला रस्त्यावरील, इमारतींमधील कचरा, माती तसेच गटारे, नाले इ.मध्ये अडकलेला कचरा, शहरात जागोजागी साचलेला कचरा साफ करण्यासाठी घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत सफाई मोहीम हाती घेण्यात आली आहे. तसेच जागोजागी जंतुनाशक फवारणी तसेच डासप्रतिबंधक धूरफवारणी सुरु करण्यात आली आहे. तसेच सार्वजनिक स्वच्छतागृहांची विशेष स्वच्छता मोहिमही हाती घेण्यात आली आहे. शहरातील जास्तीत जास्त कचरा डम्पिंग ग्राउंड वर जाण्यासाठी घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रयत्नशील आहे. प्राप्त परिस्थितीत कचरा उत्पादन करून शहर अस्वच्छ व विद्रुपीकरण करणाऱ्या घटकांवर कारवाई करण्यासाठी महानगरपालिकेच्या सफाई मार्शलनी आपली दंडात्मक कारवाईची मोहीम तीव्र केली आहे.

शहरात साथीचे आजार होऊ नयेत यासाठी मनपा वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत विविध ठिकाणी आरोग्य शिबिरे आयोजित केली जात असून नागरिकांना औषधांचे (डॉक्सीसाइक्लीन गोळ्या) वितरण मागील दोन दिवसांपासून सुरु करण्यात आले आहे. महानगरपालिकेच्या अत्यावश्यक सेवेतील कर्मचाऱ्यांसाठी, पत्रकार इ.साठीही विशेष आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत एकूण २१३ टीम कार्यान्वित करण्यात आल्या असून दि.२० व २१ ऑगस्ट रोजी दोन दिवसांत ३६५०६ नागरिकांना लॅप्टोस्पायरोसीस प्रतिबंधक गोळ्यांचे वाटप करण्यात आले आहे. तसेच विभागामार्फत डासांची पैदास होणाऱ्या ३९६१६ कंटेनरची (पाणी साठलेल्या जागांची) तपासणी करण्यात आली आहे. तसेच नागरिकांना कोणत्याही प्रकारे आरोग्याची समस्या उद्भवल्यास त्यांनी महानगरपालिकेच्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राशी संपर्क करण्याचे आवाहन वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत करण्यात आले आहे.

त्याचप्रमाणे या काळात मनपा क्षेत्रात दुषित पाणीपुरवठा होऊ नये यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात आली असून नागरिकांना स्वच्छ व सुरक्षित पाणीपुरवठा करण्यात येत आहे. तसेच घरे, इमारती इ. कडील भूमिगत पाण्याच्या टाक्यांमध्ये पुराचे पाणी शिरले असल्यास टाकी निर्जंतुकीकरण करण्यासाठी TCL पावडर आवश्यकता असल्यास नागरिकांसाठी मनपाच्या सर्व प्रभाग समिती कार्यालयात उपलब्ध करून ठेवण्यात आली आहे. तसेच नागरिकांनी पिण्याचे पाणी गाळून व उकळून पिण्याचे आवाहन महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

अतिवृष्टीमुळे शहरात अजूनही काही ठिकाणी साचलेले पावसाचे पाणी काढण्यासाठी संक्शन पंप कार्यरत ठेवण्यात आले असून घनकचरा व्यवस्थापन विभाग व पाणीपुरवठा विभागाच्या कर्मचाऱ्यांकडून शहरातील पाण्याचा निचरा होण्याकरिता शर्तीचे प्रयत्न करण्यात येत आहेत. परंतु शहरातील मुख्य नाले जे खाडीला जोडले गेले आहेत त्यांच्या पातळीत वाढ झाल्यामुळे शहरातील पाण्याचा निचरा होण्याकरिता अधिक कालावधी लागत आहे. मनपाच्या आपत्ती व्यवस्थापन विभागामार्फत सर्व शहरात ठिकठिकाणी पाहणी केली जात असून आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात येत आहेत.

आज दि.२१ ऑगस्ट रोजी झाड पडण्याच्या ०९ घटना घडल्या असून अग्निशमन विभागाकडून सदर झाडे हटवून मार्ग मोकळा करण्यात येत आहे. अतिवृष्टी काळात महानगरपालिकेच्या तात्पुरत्या निवारा केंद्रांत स्थलांतरीत केलेल्या नागरिकांची व ज्यांच्या घरात पाणी शिरले त्या नागरिकांची मागणीनुसार जेवणाची सोय करण्यात आली असून श्री जीवदानी देवी मंदिर ट्रस्ट मार्फत आज ९४०० फूड पॅकेटचे वाटप करण्यात आले.

नागरिकांच्या सेवेसाठी संपूर्ण महानगरपालिका प्रशासन सदैव तत्पर असून काहीही अडचण आल्यास नागरिकांनी महानगरपालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन केंद्रांशी संपर्क करण्याचे आवाहन महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.